# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११४ वा ❑ भारतीय सौर दिनांक २३ ज्येष्ठ शके १९४८, शनिवार दि.१३ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### सोशल मीडियाच्या माध्यमातून सणांची ग्लोबल पोहच

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

सोशल मीडियाच्या युगात फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर) आणि युट्यूब सारख्या प्लॅटफॉर्ममुळे स्थानिक सणांना जागतिक पोहोच मिळाली आहे. रील्स, थेट प्रक्षेपणे आणि हॅशटॅगजच्या वापराने सणांचे स्वरूप आता भौगोलिक सीमांपुरते मर्यादित न राहता ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहेत.

जगभरात कुठेही राहणारे लोक एका क्लिकवर गणेशोत्सव, दिवाळी, ईद किंवा नाताळ यांसारख्या सणांच्या परंपरेत आणि उत्सवात थेट सहभागी होऊ शकतात. सणांच्या तयारीचे, खाद्यपदार्थांचे आणि पारंपारिक वेशभूषेचे लहान व्हिडिओ () काही सेकंदात जगभरात व्हायरल होतात. यामुळे परदेशी नागरिकही आपल्या संस्कृतीकडे आकर्षित होतात.जागतिक हॅशटॅग्ज वापरल्याने जगभरातील लोक एकाच डिजिटल मंचावर येतात आणि सणांचे फोटो–व्हिडिओ शेअर करतात.सणांच्या निमित्ताने बनवल्या जाणाऱ्या पाककृती आणि ऐतिहासिक माहिती डिजिटल माध्यमांद्वारे सहज उपलब्ध झाल्यामुळे, परदेशातही भारतीय सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जाऊ शकतात.

सध्या धोंड्याचा महिना आणि त्यानिमित्त जावयाला सासरवाडीत बोलावून सन्मान करण्याची परंपरा सोशल मीडियावरून मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या पारंपरिक उत्साहाला सोशल मीडियाचा नवा आयाम लाभला आहे. जावयाच्या स्वागता पासून त्याच्या मानपाडा पर्यंतचा प्रत्यक्ष व्यावसायिक पद्धतीने चित्रित करून रिल्स आणि व्हिडिओच्या माध्यमातून समाज माध्यमांवर झळकविण्याचा ट्रेंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पूर्वी कुटुंबीयांनी पुरता मर्यादित असलेला हा सोहळा आता इंस्टाग्राम फेसबुक आणि युट्यूब मुळे सार्वजनिक होत आहे. जावयाच्या आगमनाची वेळी फुलांची उधळण औक्षण खास जेवणावर कुटुंबीयांसोबतचे आनंदाचे क्षण यांचे आकर्षण व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर पोस्ट करण्यात येत आहे अनेक ठिकाणी यासाठी स्वातंत्र व्हिडिओग्राफर सिनेमॅटिक कॅमेरे आणि ड्रोनचाही वापर करण्यात येत आहे यंदा धोंडा हॅशटॅग खाली शेकडो हिल्स आणि व्हिडिओ पोस्ट करण्यात आले स्थानिक संस्कृती आणि परंपरेला व्यापक व्यासपीठ मिळत असले तरी या ट्रेनमुळे काही ठिकाणी दिखाऊपणा आणि अनावश्यक खर्च वाढल्याची चर्चा देखील रंगू लागली आहे.

सोशल मीडियामुळे पारंपरिक सणांना केवळ स्थानिक पातळीपुरते मर्यादित न राहता जागतिक आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे.पारंपरिक सण केवळ एक दोन परिवारांपुरते सीमित न राहता आता या सणांना जागतिक स्वरूप मिळत आहे.सणांचे व कार्यक्रमांचे फोटो, व्हिडिओ, आणि रील्स () जगभरात सहज पोहोचतात. यामुळे एका प्रांतातील सण किंवा परंपरा दुसऱ्या प्रांतातील किंवा देशातील लोकांपर्यंत पोहोचून सांस्कृतिक देवाणघेवाण वाढीस लागली आहे. सणांमागील धार्मिक, ऐतिहासिक किंवा वैज्ञानिक महत्त्व सांगणारे लेख, पॉडकास्ट किंवा माहितीपट सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर (उदा. फेसबुक, युट्यूब, इंस्टाग्राम) उपलब्ध असतात.सणांच्या तयारीची माहिती, पारंपारिक पाककृती,शभूषा, आणि लोककलेचे सादरीकरण डिजिटल माध्यमातून तरुण पिढीपर्यंत पोहोचत आहे सणांच्या काळात लागणाऱ्या साहित्याची, खाद्यपदार्थांची आणि पारंपरिक वस्तूंची जाहिरात सोशल मीडियामुळे होते. लहान व्यावसायिक आणि कारागिरांना डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे थेट ग्राहक मिळतात. प्रत्यक्ष उपस्थित नसतानाही लोक दूरवरून व्हिडिओ कॉल किंवा लाईव्ह स्ट्रीमिंगच्या माध्यमातून सणांमध्ये, आरती किंवा उत्सवांत सहभागी घेत आहे.

आजच्या डिजिटल युगात संस्कृतीचा नवा अवतार म्हणजे तंत्रज्ञान आणि मानवी वारशाचा मिलाफ. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, मेटाव्हर्स आणि सोशल मीडियाचा वापर करून प्राचीन इतिहास, कला आणि भाषा डिजिटल स्वरूपात जतन केली जात आहे आणि लोकांपर्यंत पोहोचवली जात आहे.

समाजमाध्यमांवरील रील्स आणि शॉर्ट्सच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा एक नवा डिजिटल मार्ग तयार झाला आहे. देव आणि अवतारवादाचा सिद्धांत आता डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे नवीन पिढीला समजून सांगण्यासाठी विविध ॲप्स आणि प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. ऐतिहासिक मंदिरे, शिल्पे आणि संस्कृतीचे संग्रहालय आता घरबसल्या हेडसेटद्वारे अनुभवता येतात.

सणांच्या निमित्ताने बनवले जाणारे पारंपरिक आणि अस्सल पदार्थ आता सोशल मीडियाद्वारे जागतिक पातळीवर प्रसिद्ध होत आहेत.पर्यटनाला चालना मिळत आहे.सणांचे हे डिजिटल सादरीकरण पाहून अनेक देशी–विदेशी पर्यटक ग्रामीण भागाकडे आकर्षित होत आहेत.परंपरांचे जतन केले जात आहे.सणांचे हे डिजिटल रेकॉर्ड भावी पिढीसाठी साठवले जात असून आपल्या संस्कृतीचा प्रसार वेगाने होत आहे.

# शेतकऱ्यांना नवे आत्मभान देण्याची गरज–सुनील डोके

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – चौका घाटाजवळील डोंगरे वस्तीच्या शेतात ११ जून रोजी आयोजित 'तिफण मृगोत्सवात' शेतकऱ्यांच्या प्रश्नावर साहित्य, लोककला आणि तज्ज्ञांच्या संवादातून वैचारिक पेरणी करण्यात आली. त्रैमासिक 'तिफण', भाषा–साहित्य–संस्कृती–संशोधन परिषद आणि सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा मृगोत्सव पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक तिफण पूजनाने झाली. शेतकऱ्यांच्या हस्ते उदघाटन झाले. खऱ्या शेतकऱ्याच्या हातून फाळाला हळद–कुंकू लावून उद्घाटन करण्यात आले.



विचारांची पेरणी या सत्रात ग्रामसुराज्य फाऊंडेशनचे संचालक आणि जलतज्ञ प्रकाश चोले यांनी पाणी नियोजनाशिवाय समृद्धी शक्य नसल्याचे सांगितले. चौका परिसरात जलसिंचनाच्या कामासाठी तांत्रिक सहकार्य देण्याची ग्वाही त्यांनी दिली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत मुगले यांनी सेंद्रीय शेतीचा आग्रह धरला, तर ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाघ यांनी शेतकरी हिताच्या उपक्रमात तनमन धनाने सहकार्य करण्याची ग्वाही दिली. डॉ. रामचंद्र झाडे यांनी संत साहित्यातील शेती–पर्यावरण दृष्टीचा आढावा घेतला. यावेळी 'तिफण'चा मराठवाडा साहित्य विशेषांक प्रकाशित झाला आणि तीन प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान सुनील डोके यांनी भूषवले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून तिफण मृगोत्सवातून शेतीमातीच्या प्रश्नावर चर्चा होऊन शेतकरी समाजाला नवे आत्मभान येईल. शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक क्लिष्ट होत असून तो कायम शोषणाचा बळी ठरला आहे. अशा कार्यक्रमातून त्यांना जगण्यास बळ मिळेल. साहित्यिक व समाज यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ होऊन नवे विषय लेखनात येईल. लेखकांनी आता शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले. अशोक शेवगण, प्रकाश साळवे, संदीप ढाकणे, डॉ. सुभाष बागल, वृषाली सोनवणे, दिपाली देवरे, ज्ञानदेव डिघोळे, डॉ. नागेश बोनतेवाड, विजय कुमार पांचाळ यांसह कवींनी शेतकरी आत्महत्या, पाणी प्रश्न, पर्यावरण बदल आणि ग्रामीण स्त्रीच्या कष्टांवर कविता सादर केल्या.

संत भगवान बाबा लोककला मंच, चौका यांनी व्यसनमुक्ती, घंटागाडी, पाणी प्रश्न आणि पर्यावरण जागृती यावर गीत व साभिनय सादरीकरण करून प्रबोधन केले. रामभाऊ डोंगरे आणि संचाने सादरीकरण केले.

दिवसभराच्या चर्चेअंती चौका परिसराला पर्यटन स्थळ घोषित करणे, सरसगट कर्जमाफी, ऑनलाईन खते नोंदणी रद्द करणे, पिकाला हमी भाव, सुखना नदी पुनरुज्जीवनासाठी निधी आणि दुधदर वाढवणे यासह आठ ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. तिफण मृगोत्सव दरवर्षी भरवण्याचा ठरावही करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. सूत्रसंचालन विजयकुमार पांचाळ आणि आभार प्रदर्शन प्रकाश साळवे यांनी केले. समारोप डॉ. रामचंद्र झाडे यांनी केला.

आयोजनासाठी रामभाऊ डोंगरे, दगडूभाऊ वाघ, संतोष वाघ, शंकर बोंगाणे, विश्वनाथ डोंगरे, सोमिनाथ वाघ यांसह आयोजक मंडळाने परिश्रम घेतले.

तसेच शांतीनाथ गुजले, भाऊसाहेब गुजले, वामन घुगे, राजू वाघ, मधुकर साळवे, संतोष माळी, धृपद वाघ, साहेबराव वाघ, राहुल वाघ, शंकर बोंगाणे, विजय डोंगरे, शेतकरी अरुण भोसले, साहेबराव वाघ, वामन घुगे, संदिप गोमटे, सुभाष शेठ, संतोष भोसले, गुडू डोंगरे, अमोल घुगे, कारभारी वाघ शेख जावेद, प्राचार्य जगदाळे यांचे सहकार्य लाभले.

# कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक–गिरीश महाजन

## सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा संपन्न



ज्योतिर्मय साहित्य

नाशिक – नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळ्याने शुभारंभ झाला आहे. आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुरक्षित व भव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी शासन, प्रशासन, साधू–संत, महंत, विविध सामाजिक, धार्मिक संघटना आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देश–विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

श्री गंगा गोदावरी पंचकोठी (तीर्थ) पुरोहित संघ, नाशिकच्यावतीने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीरामाच्या जयघोषात आणि वेद मंत्रोच्चारात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा आज सकाळी कमला एकादशीच्या पर्वावर पवित्र रामकुंड, नाशिक येथे कुंभमेळा मंत्री श्री. महाजन यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महापौर हिमगौरी आडके–आहेर, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री, उपमहापौर विलास शिंदे, जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, माजी आमदार बाळासाहेब सानप, पुरोहित संघाचे सतीश शुक्ल यांच्यासह विविध आखाड्यांचे प्रमुख साधू–संत, महंत उपस्थित होते.

मंत्री श्री. महाजन म्हणाले की, पुढील वर्षी नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होत असून मागील कुंभमेळ्यापेक्षा चार ते पाच पट अधिक, म्हणजेच १२ कोटींपेक्षा जास्त भाविकांच्या आगमनाची अपेक्षा आहे. त्यामुळे कुंभमेळा यशस्वी करण्याची जबाबदारी शासन, प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी विविध संघटनांनी आणि भक्तगणांनी पुढाकार घेतला असून ही स्वच्छता केवळ एका दिवसापुरती नसून सातत्याने राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देश–विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी प्रत्येक नाशिककराने स्वयंसेवक बनून पुढाकार घ्यावा.

कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि जिल्ह्यात विविध विकासकामांना वेग आला आहे. रस्ते, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता आणि नागरी सुविधांसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची अंमलबजावणी सुरू आहे. या विकासकामांमुळे पुढील वर्षी नाशिकचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कुंभमेळ्याच्या तयारीत साधू–संत, महंत, आखाडे, लोकप्रतिनिधी, प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि नागरिक यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगून मंत्री श्री. महाजन यांनी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे नमूद करुन त्यांनी कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, संजयदत्त महाराज यांनी मनोगत व्यक्त केले.


याप्रसंगी दिगंबर आखाड्याचे महंत वैष्णवदास महाराज, मंगल पीठाधीश्वर माधवाचार्य महाराज, निर्वाणी आखाड्याचे महंत मुरलीधरदास महाराज, महंत मोहनदास महाराज, महंत राजेंद्रदास महाराज, महंत रामजीदास महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज, रामकिशोरदास शास्त्री महाराज, महंत रामस्नेहीदास महाराज यांच्यासह विविध आखाड्यांचे संत–महंत, भाविक, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विधीवत पूजा करुन गंगा गोदावरीचे पूजन करण्यात आले. शंखनाद आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन समारंभ भक्तीमय वातावरणात पार पडला. पुरोहित संघाच्या सदस्यांनी मंत्रोच्चार केले.










# जात्यावरच्या ओव्या......

आल भरून आभाळ
विजा नाचती नभात
बाळासंग गायीगोप
सांज झाली रानात ||६८९||

आल भरून आभाळ
झाडंझुडप कोसळती
वाट रानाची अडवळ
शेती बाळ न् सोबती ||६९०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३९




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' हे आपल्याला कळते पण वळत नाही आणि आपला सुखाचा आणि समाधानाचा शोध सुरूच राहतो. प्रत्येक परिस्थितीत आपली सुखाची आणि समाधानाची व्याख्या बदलत जाते. मला नोकरी लागली म्हणजे मी सुखी होईल, माझ्या पगारात वाढ झाली म्हणजे मी सुखी होईल, माझ्याकडे आज जी चारचाकी आहे, उद्या त्यापेक्षा आणखी चांगल्या प्रकारचे वाहन आले म्हणजे मला समाधान लाभेल. आणखी जमीन, आणखी घरे, बंगले यासारख्या गोष्टी माणूस मिळवण्यासाठी माणूस धडपड करतो आणि त्यासाठी आयुष्यभर धाव धाव धावतो. परंतु त्याची हाव संपत नाही. कुठे थांबायचे हे त्याला कळत नाही.



एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही.

परमेश्वर प्राप्तीच्या आड जर काही येत असेल तर ते म्हणजे आपले मन ! आपले मन अतिशय चंचल आहे आणि ही गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून तर एका गाण्यात म्हटले आहे, '' माझिया मना जरा जरा थांब ना, तुझे धावणे अन् मला वेदना !'' म्हणून समर्थ म्हणतात की आपले हे चांचल्य म्हणजे चंचलता भगवंताला अर्पण करून आपली चित्त त्याच्याकडे केंद्रित करावे. त्याचे ध्यान लागावे.


गीतेत भगवंत म्हणतात
''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज''
सर्वधर्म म्हणजे आपली सुखदुःखे, कर्म, वासना आदी सगळे भगवंताला अर्पण करून त्याला शरण जावे. तो आनंदनिधान आहे. अक्षय सुख आणि समाधान त्याच्याच ठायी आहे.

स्वसंवाद : १) मी ज्या सुखाच्या शोधात धावत आहे, ते खरोखरच मला समाधान देणारे आहे का? की ही केवळ अंतहीन धावपळ आहे?

२) माझ्या मनातील चंचलता, अपेक्षा आणि असंतोष मी कधी परमेश्वराला अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे का?

३) ''समाधान'' ही बाह्य गोष्टींमध्ये नसून अंतर्मनात आहे हे मला खरेच पटले आहे का?

(क्रमशः)




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

# || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ माणुसकी

माणुसकी हा धर्म आहे उपकार नाही, अडलेल्याला माणुसकीच्या नात्याने मदत करा त्या बदले अपेक्षा ठेवू नका चांगल्या कर्मांची फळे नेहमी चांगलीच असतात. आपण फक्त धर्म पाळायचा आणि कर्म करत रहावे.

# नाम आणि प्रेम ही जुळी भावंडे आहेत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

साधारण प्रापंचिकाची ओढ विषयाकडे असते. आज सुख कशात आहे एवढेच तो बघतो, आणि विषयात तो इतका तल्लीन होतो, की जगालाही तो तुच्छ मानतो. विषय शेवटी दुःखालाच कारणीभूत होतात हे तो विसरतो. विषय आणि मी एक होतो तेव्हा सुख होतेसे वाटते. पण वास्तविक, आजवर कुणालाही विषयाने शाश्वत सुख आणि समाधान मिळालेले नाही. असे सुख आणि समाधान मिळवण्यासाठी आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवणे हा एकच उपाय आहे. वृत्ती नेहमी एकाकार व्हावी, पण ती विषयात न होता नामात व्हावी, हेच सर्व संतांचे सांगणे आहे. ' मना ' ला उलटे केले की 'नाम' हा शब्द तयार होतो. याचा अर्थ असा की, नाम घेणे म्हणजे मनाची विषयाकडे असलेली ओढ उलटी फिरविणे. नाम म्हणजेच ' न मम '. प्रपंच माझा नाही म्हणून करणे म्हणजेच नाम घेणे. मी जितकी प्रपंचाची काळजी घेतो तितकी नामाची घेतो का, याचा प्रत्येकाने विचार करावा. प्रपंचातले आपले कर्तव्य अगदी मनापासून केल्यावर, जी परिस्थिती निर्माण होईल तिच्यामध्ये अत्यंत समाधानाने राहून नामस्मरणात काळ घालवावा.

निर्गुणाला एक जुळे झाले; ते म्हणजे नाम आणि प्रेम. दोन्ही एकमेकांना अतिशय चिकटून आहेत. एकाला धरले की दुसरे त्याच्या मागे येते. आज आपले प्रेम अनेक वस्तूंवर, व्यक्तींवर, पैशावर, विद्येवर, देहावर, लौकिकावर गुंतले आहे. त्या कारणाने, भगवंतावर प्रेम करून त्याच्यामागे नाम येईल अशी आपली अवस्था नाही. गोपींची तशी अवस्था होती. पण आपण नामाला वश करून घेऊ शकतो. ते झाले की भगवंताचे प्रेम आपोआप येईल. घरादारावर प्रेम सहवासाने बसते; मग नामाचा सहवास केला तर प्रेम का लागणार नाही ?

खरोखर, या जगात कुणाच्या बुद्धीला पचविता आल्या नाहीत अशा कितीतरी वस्तू आहेत. मुलाला आपल्या बापाचे बारसे पाहाणे जसे शक्य नाही, तसे ' मी कोण आहे ? ' हे बुद्धीने ओळखणे शक्य नाही. खरी सत्य वस्तू कल्पना, बुद्धी आणि तर्क यांच्या पलीकडे आहे. सत्याचा शोध करायचा असेल तर सत्य ज्याने झाकले आहे ती वस्तू दूर करा, म्हणजे सत्य दिसेल. सत्य हे आपल्याला उत्पन्न करता येत नाही; पण उपाधी मात्र उत्पन्न करता येते. उदाहरणार्थ, भीती, कल्पना इत्यादि आपणच उत्पन्न करतो. नदीच्या पुलावर उभे राहिले असता पायाला पाण्याचा स्पर्श न लागता देखील, वाहणाऱ्या पाण्याची मजा अनुभवता येते; त्याचप्रमाणे भगवंताचे सत्यत्व ज्याच्या अंतःकरणाला पटले, तो विषयामध्ये राहून देखील, होणाऱ्या सुखदुःखाच्या गोष्टींकडे गंमत म्हणून बघेल आणि त्यापासून स्वतः अलिप्त राहील.

सुख हे विषयात नसून आत्म्यात आहे. आत्मा सुख-रूप आहे.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे



## संत निवृत्तीनाथ महाराज


हरी कथांचे नित्य श्रवण, नाम संकीर्तनाचा गजर, या सार्या इतके अन्य दुसरे सुखच नाही. पंढरपुरातील वारकर्यांच्या नामघोषात मी तु पण सरून जाते. जातीभेदाचा पडदा गळून पडतो. लहान थोर कोणी उरतच नाही. सर्वच त्या पांडुरंगाचे भक्त हा एकात्म भाव दृढ होतो. अशा आनंदात बेभान व्हायला, अशी दिवाळी साजरी करायला निवृत्तीनाथांना आवडते.

बालकांना, तरुणांना दिवाळी म्हणजे आनंदाची पर्वणी असते. अशा कुमार वयातील संत ज्ञानेश्वरांना दिवाळी कशी साजरी करायची होती? याबद्दल ते काय लिहितात तेही आता आपण पाहू.

*शांती दिसे ओहम् पर दिसे सोहम्/ क्षमा ते कोहम् कारुण्य सदा// स्नेहाची दिवाळी फेडूनी काजळी या दिपे ओवाळी जीव शिवी//ज्ञेय ज्ञाता ज्ञान दृष्टा द्रष्टा दिप्ती/ रुपी रूप स्थिती अंकुरलासे// बाप रखुमादेवीवर विठ्ठल साच/ मी माझे आहाच वायाविन//

क्रमश:..........

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## "आपली भुमीका श्रेष्ठ"

माणूस असो की स्री तिला संपूर्ण आयुष्यात बाल, तरूण व वृद्ध अवस्थातून जावे लागते. म्हणजे तुम्हाला सुख दुःखाचे चटके म्हणजेच तरंग
सहन करायचे असतात. तर हे अनुभव, चटके किंवा तरंग म्हणा वेगवेगळ्या वेळी, वेगवेगल्या घटका द्वारे येतात. हे आपण लक्षात ठेवावे. उदा.
कधी घटना, कधी माणसे पैसा बरोबर ना! महिला जशा मुलगी बायको आई ई.मधून
जाते तसे पुरूषसुद्धा. दोघेही आपापल्या भूमिकेला न्याय देण्यासाठी कष्ट करतात, बोलतात वागतात आणि त्यातून जे प्रसंग, अनुभव मिळतात, प्रतिक्रिया होतात, याच मानसिक शारिरीकदृष्ट्या त्यालाच आपण सुखदुःखाचे तरंग म्हणतो! दुसरे काही नाही. बघ पटते का. हे सर्व असेच आहे. आणि हे चक्र सतत चालूच असते! म्हणून या तरंगातून सहज बाहेर पडायचे तर तुमच्या भुमीकेचे, वर्तणूकिचे शैलीचे स्वतः मुल्यमापन करणे चांगले! मुलांनी ऊच्च भरारी घेऊन प्रगती करावी अशीच प्रत्येक आईबापाची भुमिका ईच्छा असते. पण कोणीही मातीसी नातं विसरू नये. परदेशातील ऐषारामात स्वदेशाची ऊब कशी मिळेल? थकलेल्या आई वडिलांची किंमत कोणत्याही पैशात मोजता येत नाही, म्हणूनच आपली भुमीका श्रेष्ठ ठरते! आज पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो.




# डिप्रेशन

ज्योतिर्मय साहित्य


डिप्रेशन किंवा नैराश्य ही केवळ तात्पुरती उदासी नसून ती एक गंभीर मानसिक स्थिती आहे. यामध्ये व्यक्तीला सतत दुःख जाणवणे, कामात रस कमी होणे आणि दैनंदिन आयुष्य जगताना निरुत्साह वाटणे अशी लक्षणे दिसतात. डिप्रेशनची काही मुख्य लक्षणे म्हणजे झोप न येणे किंवा अति झोप येणे, भूक मंदावणे, एकाग्रता कमी होणे आणि स्वतःला दोष देत राहणे.

डिप्रेशनवर काही नैसर्गिक आणि प्रभावी उपाय

औषधोपचारांसोबतच जीवनशैलीत काही बदल केल्यास मनाची स्थिती सुधारण्यास मोठी मदत होते.

१. सूर्यप्रकाश आणि व्हिटॅमिन डी : सकाळच्या कोवळ्या उन्हात किमान १०-१५ मिनिटे बसा. सूर्यप्रकाशामुळे शरीरात सेरोटोनिन () या हार्मोन्सची निर्मिती वाढते, ज्यामुळे मूड सुधारण्यास मदत होते.

२. पौष्टिक आणि संतुलित आहार : तुमच्या आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स (अक्रोड, अळशी), हिरव्या पालेभाज्या आणि फळांचा समावेश करा. जंक फूड आणि जास्त साखर असलेले पदार्थ टाळा, कारण ते शरीरातील ऊर्जेची पातळी कमी करतात.



३. नियमित दिनचर्या : नैराश्यामध्ये दिवसाचे नियोजन विस्कळीत होते. झोपण्याची, उठण्याची आणि जेवणाची एक ठराविक वेळ निश्चित करा. छोटे-छोटे ध्येय () ठरवा आणि ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

४. योग आणि ध्यान (मेडिटेशन) : योगासने आणि ध्यान केल्याने मानसिक शांतता मिळते. भ्रामरी प्राणायाम किंवा अनुलोम-विलोम सारखे श्वसनाचे प्रकार मज्जासंस्थेला शांत करतात आणि नकारात्मक विचार कमी करण्यास मदत करतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५. सोशल कनेक्टिव्हिटी : एकटे राहणे टाळा. आपल्या जवळच्या मित्रांशी किंवा कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा. तुमचे विचार शेअर केल्याने मनावरचा ताण हलका होतो.

६. पुरेशी झोप : मानसिक आरोग्यासाठी रात्रीची ७ ते ८ तासांची सलग झोप अत्यंत आवश्यक आहे. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्क्रीनचा वापर कमी करा.

७. छंद जोपासा : तुम्हाला जे आवडते मग ते गाणे असो, बागेत काम करणे असो किंवा वाचन त्यासाठी वेळ काढा. सृजनात्मक कामांमुळे मेंदूला उभारी मिळते.

महत्त्वाची सूचना: नैसर्गिक उपाय हे प्राथमिक अवस्थेत किंवा पूरक म्हणून काम करतात. जर नैराश्याची भावना तीव्र असेल, आत्महत्येचे विचार येत असतील किंवा दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ लक्षणे टिकून असतील, तर

*मानसशास्त्रज्ञ किंवा मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत अनिवार्य आहे.

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### मोबाईल

मोबाईल आहे खरा
माझ्या खूपच आवडीचा
नेहमी माझा सोबती
हातात असे तो
सखा जणू प्रेमळ
गाणे मिळूनी गाती

मोबाईल जवळ नसता
करमत मुळीच नाही
हातात असावा वाटते
माहिती आणि तंत्रज्ञान
यामुळे आनंद मिळता
मन समाधान पावते

# गिग व प्लॅटफॉर्म कामगारांनी २१ जून २०२६ पूर्वी वर नोंदणी करावी

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाने राज्यातील सर्व गिग व प्लॅटफॉर्म कामगारांना केंद्र सरकारच्या पोर्टलवर तात्काळ नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. केंद्र सरकारने स्विगी, झोमॅटो, उबेर, ओला, रॅपिडो, ब्लाइंकीट, झेपटो तसेच इतर डिजिटल प्लॅटफॉर्म कंपन्यांमध्ये कार्यरत गिग व प्लॅटफॉर्म कामगारांची पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य केले असून, २१ जून २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

आजच्या डिजिटल अर्थव्यवस्थेत लाखो युवक डिलिव्हरी पार्टनर, कॅब चालक, बाईक टॅक्सी चालक आणि विविध प्लॅटफॉर्मद्वारे सेवा देणारे स्वतंत्र कामगार म्हणून कार्यरत आहेत. मात्र, त्यांच्यापैकी मोठ्या संख्येने कामगार सामाजिक सुरक्षा व्यवस्थेच्या कक्षेबाहेर आहेत. नोंदणीमुळे या कामगारांचा अधिकृत डेटा तयार होऊन भविष्यातील सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, अपघाती विमा संरक्षण, शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ तसेच कामगारांच्या हक्कांच्या



संरक्षणासाठी आवश्यक धोरणे तयार करण्यास मदत होणार आहे.

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाचे प्रदेश महामंत्री श्री. किरण मिलगीर यांनी सांगितले की, ''ही नोंदणी केवळ औपचारिकता नसून गिग व प्लॅटफॉर्म कामगारांच्या सुरक्षित आणि सन्मानजनक भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र कामगाराने २१ जून २०२६ पूर्वी स्वतःची नोंदणी पूर्ण करावी.''

प्रदेश उपाध्यक्ष श्री. सचिन मेंगाळे यांनी राज्यातील सर्व कामगार संघटना, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना आवाहन केले की, आपल्या परिसरातील प्रत्येक गिग व प्लॅटफॉर्म कामगारापर्यंत ही माहिती पोहोचवून जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करण्यात पुढाकार घ्यावा. सामाजिक सुरक्षेच्या कवचाखाली प्रत्येक कामगाराला आणण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाने सर्व डिलिव्हरी पार्टनर्स, कॅब चालक, बाईक टॅक्सी चालक व इतर प्लॅटफॉर्म कामगारांना आवाहन केले आहे की, विलंब न करता पोर्टलवर नोंदणी करून आपले हक्क आणि भविष्यातील सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करावी.



## प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे गुणवंत नातवांचा सत्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेने १० वी, १२वी च्या ३१ गुणवंत नातवांचा सत्कार आयोजित केला होता. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मधील योगशास्त्र व मराठी विभाग प्रमुख डॉ. सुहास पाठक प्रमुख पाहुणे होते. अध्यक्ष प्रमोद बेंडे, सचिव कमलाकर पाठक, उपाध्यक्ष वंदना देशमुख, कोषाध्यक्ष दिनेश जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. कमलाकर पाठक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमोद बेंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्योती पाटील यांनी सूत्र संचालन व आभार प्रदर्शन केले. गुणवंत विद्यार्थ्यांना बॅग, पेन, कॅप, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. संस्थेतर्फे बॅग व सन्मान पत्र, प्रमोद बेंडे यांच्या तर्फे पेन, कमलाकर पाठक यांनी कँप, अनलॉक फार्मसी तर्फे स्मृतिचिन्ह प्रत्येक विद्यार्थ्यांना देण्यात आले.

उद्योजक श्रीकांत देशमुख यांच्या तर्फे सर्व विद्यार्थ्यांना राजयोग या ग्रंथाची प्रत देण्यात आली. शैला मोहनपुरकर, सी डी देशमुख, निर्मला सांबरे, नलिनी लेकुरवाळे, निर्मला बडवे यांनी १००% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख ₹५००/- बक्षीस दिले.

डॉ.सुहास पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अन्नदान, रक्तदान, देहदान याहीपेक्षा ज्ञानदान हे श्रेष्ठ आहे कारण संपूर्ण ज्ञानाने जीवनाचे सार्थक होते. आत्मविश्वासाने आनंदाने सुखाने जिवाचा प्रवास करण्यासाठी ज्ञानसंपन्न होणे हे खूप गरजेचे आहे त्यासाठी ज्या ज्या ज्ञानशाखेत आपण प्रवेश घेऊ त्याच्यावर परमेश्वरा इतकीच प्रचंड श्रद्धा ठेवून आनंदाने अभ्यास करा ज्ञान हाच आपल्या जीवनाचा तिसरा डोळा आहे. ज्याच्या नशिबात प्रचंड कष्ट आहेत तिथेच सरस्वती आणि लक्ष्मीची कृपा सदैव असते. आपल्या माता-पितांना प्रणाम करून कार्यारंभ करावा यश आपल्या पाठीशी असणारच.

विद्यार्थ्यांचे आजी आजोबा, पालक, माजी अध्यक्ष, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीयश पॉलीटेक्नीक महाविद्यालयाच्या १५५ विद्यार्थ्यांची पेड इंटर्नशिपसाठी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - श्रीयश प्रतिष्ठान संचलित श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) येथील द्वितीय वर्षातील तब्बल १५५ विद्यार्थ्यांची सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल या शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना धूत इलेक्ट्रिकल सिस्टम, एलएपीएल लिमिटेड तसेच मनजित प्राईड्स माय वर्ल्ड या नामांकित उद्योगसंस्थांमध्ये इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांनी नुकतीच संबंधित कंपन्यांमध्ये रुजू होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात केली आहे.

सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, या



उद्देशाने ही इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे, सेंट्रल टीपीसी तसेच प्राचार्य यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थी रुजू होताना मुख्याधिकारी कमांडर प्रदीप सिंग, प्राचार्य प्रा. संदीप खंडागळे, डीन अकॅडेमिक्स डॉ. पी. एम. अर्धापुरकर व विभागप्रमुख उपस्थित होते.

# उद्योजक राजेंद्रजी तापडिया यांचा जागतिक स्तरावर मानांकन मिळाल्या बद्दल सत्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

भोसलेनगर, पुणे : पॅकेजिंग क्षेत्रातील नामांकित उद्योजक तसेच श्रीभगवती सेवा आश्रम, बाणेर यांच्या विविध सामाजिक उपक्रमांचे आश्रयदाते व मार्गदर्शक श्री. राजेंद्रजी तापडिया यांना जागतिक स्तरावरील प्रतिष्ठेचा 'वर्ल्डस्टार सस्टेनेबिलिटी अवॉर्ड' प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

जर्मनीतील ड्युसेलडार्फ येथे आयोजित आंतरराष्ट्रीय उद्योग उत्पादन मेळाव्यात सेफपॅक च्या पर्यावरणपूरक, शाश्वत व टिकाऊ पॅकेजिंग संकल्पनांना जागतिक मान्यता मिळाली. याबद्दल संयुक्त राष्ट्रसंघाच्या पाठबळाने दिले जाणारे दोन 'वर्ल्डस्टार सस्टेनेबिलिटी अवॉर्ड' त्यांना प्रदान करण्यात आले. हा सन्मान वर्ल्ड पॅकेजिंग ऑर्गनायझेशनच्या अध्यक्षा श्रीमती ल्युसियाना पेलेडिना यांच्या हस्ते देण्यात आला.

या उल्लेखनीय यशाबद्दल सेफपॅक इंडस्ट्रीज लिमिटेड चे अध्यक्ष श्री. राजेंद्रजी तापडिया यांचा श्रीभगवती सेवा आश्रमाचे संकल्पक गिरीधर राठी, डॉ. श्याम कुलकर्णी, स्काऊटचे उत्तमलाल रामधनी तसेच महामार्ग कंत्राटदार प्रशिल अग्रवाल



यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी श्री.राजेंद्र तापडिया यांच्या उद्योगक्षेत्रातील योगदाना सह पर्यावरणपूरक व शाश्वत विकासासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.


■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.


सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## पिढ्यांना जोडून ठेवणारे आजी-आजोबा



सौ.मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे देगलूर. 9960028899




विनय आणि नयन या वर्षी दिवाळीसाठी सुट्टी मिळाली, की आधी गाव गाठलं. दरवर्षी फक्त चार दिवस राहणं होतं गावी. पण या वर्षी तब्बल दहा दिवसांची सुट्टी घेऊन दोघे ख़ुशी ख़ुशी गावी निघाले. गावी पोहोचले. हिरवेगार रान, शेणा-मातीची साधी घरं, भिंतीवर थापलेल्या गवऱ्या, गाई-म्हशी, शेळ्या- मेंढ्या, आंबा, चिंच, पिंपळ, वड, उंबर, बोरी, कडूलिंब, बाभळीची भलिमोठी झाडं, चोळी- फडक्यातल्या लहानग्या पोरी अंगणात झिम्मा खेळत होत्या. अजून किती सांगावी सुंदर गावाची सुंदर महती. गावाचं हे सगळं सौन्दर्य पाहत पाहत घराजवळ पोहोचले.

शेणाने सारवलेल्या भल्या मोठ्या अंगणात पणजी- पणजोबा आजी-आजोबा, आई-बाबा, मोठे, मधले, छोटे सर्व काका-काकी,आत्या-मामा, चुलत भावांच्या मुलांची मुलं बाळं. या सगळ्यांनी अख्ख अंगण भरलं होतं. काय तो गोतवाळा, काय ती माणसं. हातातल्या, पाठीवरच्या बॅगा खाली ठेवतो न ठेवतो आजी-आजोबा भाकरीचा कुटका ओवाळून टाकला. मी आजी आजोबांच्या पाया पडल्या. आणि दोघांना घट्ट मिठी मारून रडू लागलो. आजी आजोबा माझे मुके घेत माझा लाड करत होते. खरंतर आजी आजोबांचे ही अश्रू थांबत नव्हते.

थोड्या वेळाने सगळ्यांची गरमा गरम मस्तसं जेवणं झाली. आणि दुसऱ्या दिवशी पासून आमची दिवाळीची जय्यत तयारी सुरु झाली. घराची सजावट, फराळाचं सामान, कपडे खरेदी, बॉम, फटाके. वसुबारसला मी आजीसोबत शेणाच्या गवळणी बनविल्या. भारी मजा आली. वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मी पूजन, दीपावली पाडवा, भाऊबीज. भाऊबीजेला ओवाळणी म्हणून आम्ही सर्व भावंडांनी बहिणींना पैठण्या दिल्या. दिवाळी सण भारीच साजरा झाला. आजोबा बाहेर अंगणात कडुनिंबाच्या झाडाखाली बसून आम्हाला प्रेमानं, नवलानं बघत होते. आम्हा नातवंडांना खेळताना बघून आजोबांच्या चेहऱ्यावर एक वेगळीच ख़ुशी होती.

आजी, आई, काकी, बहिणी सर्वजण चुलीजवळ स्वयंपाकात मग्न होत्या. चुल घरातून स्वयंपाकाचा, तऱ्हे तऱ्हेच्या पदार्थांचा मस्तसा खमंग वास साऱ्या घरभर घुमत होता. आधी आजोबा, बाबा, काका आणि आम्हा भावांडांची लाईनशीर शिस्त पंगत बसली. जेवणावर तावा मारला नि पंगत उठली. आणि नंतर सगळ्याजणी जेवायला बसल्या. जेवणं उरकली. आणि बाहेर अंगणात चवाळं, सतरंजी अंथरून सारेजण बोलत बसलो. आजी आजोबांना अडकीत्याने सुपारी काढून देत होती. मग आजोबा आम्हा सर्वांना जवळ घेऊन म्हणाले,'पोराबाळांनो दरवर्षी प्रमाणे भारीच चांगली साजरी झाली आपली दिवाळी. असंच सर्वजण मिळून मिसळून एकत्र राहा. क्रमश:........

## मुलांसाठी लघु बोधकथा



### गुरु केले कासवाला



कोणे एके काळी एका नगरात एक वृद्ध एकटाच राहत होता. छोट्याशा झोपडीत राहून तो आजूबाजूच्या शेतात छोटीमोठी कामे करून स्वत:ची गुजराण करत असे. आपल्या गरजा त्याने खूपच मर्यादित ठेवल्या असल्याने त्याला फारसा खर्च येत नसे.

मात्र हे असताना त्याने एक कासव पाळले होते आणि त्या कासवावर त्याचा फार जीव होता.

दुपारी आपले जेवण तयार करताना तो कासवासाठी हरभरे भिजवून त्याला देत असे. रिकामा वेळ असताना तो त्या कासवाशी संवाद साधत असे. आजूबाजूचे लोक त्याचे ते कासवप्रेम पाहून हसत असत. एके दिवशी एक परिचित मनुष्य त्याला भेटण्यासाठी आला.

थोडा वेळ इकडचे तिकडचे बोलून झाल्यावर त्याने त्या कासवाला पाहिले व तो मनुष्य म्हणाला,"

तू इतका घाणेरडा प्राणी कशासाठी पाळला आहेस. सोडून दे त्या कासवाला."

त्याच्या बोलण्याने वृद्धाला खूप वाईट वाटले. वृद्ध म्हणाला,"अरे मित्रा, तू असे बोलून माझ्या काळजाला हात घातला आहेस. इतके वाईट तर मी कधीच त्या कासवाबद्दल माझ्या मनात किंवा स्वप्नातसुद्धा विचारत आणत नाही. ते कासव माझ्या गुरुस्थानी आहे म्हणून माझ्या मनात त्याच्याबद्दल खूप आदर आहे." तो माणूस म्हणाला,"ते कासव तुझे गुरु कसे काय बरे ठरते" वृद्ध म्हणाला," कासव हे मानवी मनाचे प्रतिक आहे. कासव आपल्याला हे शिकवते की त्याच्यावर जरा जरी संकटाची चाहूल लागली तरी ते जसे स्वत:चे अंग आक्रसून कवचाखाली जाते त्याप्रमाणेच मानवाने वाईट गोष्टींची जराशी चाहूल जरी लागली तरी त्यापासून लांब राहिले पाहिजे. कासवाप्रमाणे आपण आपल्या मनाला वाईट गोष्टींपासून अंग चोरण्याचा प्रयत्न केला तर मानवाचे त्यात भले आहे."

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताची वाटचाल



ॲड.प्रा. कौशिक म. हरणे. मो.- 96731 75197



मागील भागावरून पुढे......

हा तोच देश आहे ज्याने जगाला नारायण मूर्ती, शिव नाडर, अझीम प्रेमजी, नंदन निलेकणी यांसारखे दूरदर्शी उद्योजक दिले. या उद्योजकांनी केवळ कंपन्या उभारल्या नाहीत, तर भारताला जागतिक तंत्रज्ञान नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले. आजही भारतीय युवकांमध्ये प्रतिभा, मेहनत, नवकल्पना आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता कमी नाही. तसेच आजच्या तरुणाईने देखील आपली जबाबदारी समजत आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर केवळ फोटो एडिटिंग, रील्स आणि क्षणिक मनोरंजनासाठी न करता ज्ञाननिर्मिती, संशोधन, स्टार्टअप्स, तंत्रज्ञान विकास आणि समाजोपयोगी नवकल्पनांसाठी करायला हवा. कारण आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर प्रभुत्व मिळवणारी पिढीच उद्याच्या जगाचे नेतृत्व करणार आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रातील हार्डवेअर निर्मितीत भारत सध्या मागे असला, तरी आर्टिफिशियल इंटेलिजन्स-आधारित सॉफ्टवेअर, अनुप्रयोग विकास, डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग, सायबर सुरक्षा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि नवकल्पना यामध्ये भारताला नेतृत्व मिळवण्याची सुवर्णसंधी आहे. आगामी दशक हे केवळ आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे नसून, त्याचा प्रभावी वापर करून समाज आणि अर्थव्यवस्था बदलणाऱ्या राष्ट्रांचे असेल. भारताने आज योग्य दिशा, योग्य धोरणे आणि योग्य गुंतवणूक निवडली, तर तो केवळ आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा ग्राहक राहणार नाही; तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रातील जागतिक नेतृत्व करणारे राष्ट्र म्हणून उदयास येऊ शकतो. आजचा प्रश्न भारत आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरेल का, हा नाही; तर भारत आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्रांतीचे नेतृत्व करेल का, हा आहे. आणि त्या प्रश्नाचे उत्तर आपल्या आजच्या निर्णयांमध्ये, धोरणांमध्ये आणि दूरदृष्टीत दडलेले आहे.

■ ■ ■ ■

# आत्मसाक्षात्कार व्हावा प्रकृतीचा खेळ कळावा...

ज्योतिर्मय साहित्य
(दैनंदिन नक्षत्र विशेष लेखमाला)

पंचांग आणि ज्योतिषशास्त्रानुसार दररोजचा दिवस हा एका विशिष्ट तिथी, रास आणि नक्षत्राच्या संयोगानेच तयार होतो. त्यामुळे प्रत्येक दिवसाची एक वेगळी ऊर्जा, वैशिष्ट्य आणि महत्त्व (दिनविशेष) असते. भारतीय ज्योतिषशास्त्रानुसार (वैदिक ज्योतिष) नक्षत्रांचा प्रवास हा अश्विनी नक्षत्रापासून सुरू होतो आणि रेवती नक्षत्रावर संपतो. हा केवळ २७ नक्षत्रांचा क्रम नसून, तो मानवी जीवनाच्या उत्क्रांतीचा आणि आत्म्याच्या प्रवासाचा एक मार्ग मानला जातो.

**या प्रवासाचे सविस्तर विवेचन खालीलप्रमाणे आहे:**

**१. नक्षत्रांचे चक्र : एक आध्यात्मिक प्रवास**

नक्षत्रांचे हे चक्र एकूण २७ नक्षत्रांचे असते. हा प्रवास केवळ आकाशातील ताऱ्यांचे स्थान नाही, तर ते मानवी जीवनाचे टप्पे दर्शवते:

सुरुवात (अश्विनी): अश्विनी म्हणजे जन्म. हा सुरुवातीचा बिंदू आहे, जिथे आत्मा जगात येतो. यात अपार उत्साह, गती आणि नवीन काहीतरी घडवण्याची जिद्द असते. म्हणूनच याला नव्याची सुरुवात मानले जाते. मध्य (मघा, चित्रा, स्वाती इत्यादी): जसा प्रवास पुढे जातो, तसा तो मानवी जीवनातील संघर्ष, भौतिक प्रगती, विवाह, यश आणि अपयश यांतून जातो.

अखेर (रेवती): रेवती म्हणजे पूर्णत्व. हा २७ व्या नक्षत्राचा शेवटचा टप्पा आहे. इथे भौतिक जगाचा प्रवास संपून आत्मा मोक्षाच्या किंवा विश्रांतीच्या प्रवासाकडे झुकतो.

**२. संस्कृत श्लोक**

नक्षत्रांच्या या मालिकेचे महत्त्व सांगणारा एक श्लोक खालीलप्रमाणे आहे:

अश्विनी भरणी कृत्तिका रोहिणी मृगशीर्षका।
आर्द्रा पुनर्वसुः पुष्योऽश्लेषा मघा फल्गुनीद्वयम्।।
हस्तश्चित्रा तथा स्वाती विशाखा चानुराधा च।
ज्येष्ठा मूला तथा पूर्वा-उत्तरा च ततः परम्।।
श्रवणा धनिष्ठा शतभिषा पूर्वा-उत्तरा भाद्रपदा।
रेवती च ततः स्युर्वे नक्षत्राणि खगोचरे।।

**३. अश्विनी ते रेवती: एक तात्विक दृष्टिकोन**


अश्विनी (आरंभ): हे नक्षत्र केतूच्या अंमलाखाली येते. हे अश्विनीकुमारांचे नक्षत्र आहे, जे शक्ती आणि उपचाराचे प्रतीक आहे. इथून जीवनाचा वेग सुरू होतो.

रेवती (समाप्ती): हे नक्षत्र बुधाच्या अंमलाखाली येते आणि याचे दैवत पूषन (मार्गदर्शक/रक्षक) आहे. हे नक्षत्र अतिशय सात्त्विक, संवेदनशील आणि आध्यात्मिक मानले जाते. जेव्हा प्रवास रेवतीवर संपतो, तेव्हा व्यक्तीला जीवनाचे पूर्ण ज्ञान झालेले असते.

४. आज आपण अश्विनी नक्षत्रात आहोत, याचा अर्थ असा की तुम्ही सध्या एका नवीन चक्राच्या सुरुवातीच्या टप्प्यावर आहात. हे नक्षत्र नवीन काहीतरी शिकण्यासाठी, नवीन काम सुरू करण्यासाठी किंवा जुन्या गोष्टी विसरून नवीन दिशा पकडण्यासाठी सर्वोत्तम असते.

अश्विनी ते रेवती या प्रवासात जसे आपण २७ टप्पे पार करतो, तसे आपल्या आयुष्यातही दररोज एक छोटा प्रवास असतो. उद्या जेव्हा नक्षत्र बदलेल (भरणी), तेव्हा त्या दिवसाची ऊर्जा वेगळी असेल.

आजच्या दिवशी (१२ जून २०२६) जर पंचांगानुसार मेष रास, अश्विनी नक्षत्र आणि द्वादशी तिथी यांचा संयोग असेल,




तर हा अतिशय सुंदर आणि ऊर्जावान दिनविशेष ठरतो.

ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने आजच्या या विशेष दिवसाचे महत्त्व आणि प्रभाव खालीलप्रमाणे सांगता येईल:

**आजच्या दिवसाचे (दिनविशेष) महत्त्व**

कार्यारंभासाठी उत्तम दिवस: अश्विनी हे आकाशमंडळातील पहिले नक्षत्र आहे आणि मेष ही पहिली रास आहे. त्यामुळे नवीन योजना आखणे, नवीन व्यवसाय सुरू करणे किंवा नवीन संकल्प करण्यासाठी आजचा दिवस खूप सकारात्मक ऊर्जा देणारा आहे.

आरोग्य आणि उपचारांसाठी शुभ: अश्विनी नक्षत्राचे देव अश्विनीकुमार (देवांचे वैद्य) असल्याने, आजच्या दिवशी आरोग्याशी संबंधित निर्णय घेणे, नवीन औषधोपचार सुरू करणे किंवा डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत फलदायी मानले जाते.

आध्यात्मिक प्रगती (द्वादशीचा प्रभाव): आज द्वादशी तिथी असल्याने भगवान विष्णूंची कृपा दिवसभरावर राहील. एकादशीच्या उपवासानंतर येणारी द्वादशी ही साधनेचे फळ देणारी मानली जाते. त्यामुळे आज नामस्मरण किंवा दानधर्म केल्यास मानसिक शांती मिळते.

**आजच्या दिवशी काय करावे?**

''प्रथमं सर्वकार्याणां नक्षत्रं अश्विनी स्मृतम्।''

अर्थात, सर्व कार्यांच्या सुरुवातीसाठी अश्विनी नक्षत्राला प्रथम आणि श्रेष्ठ मानले गेले आहे.

विष्णू उपासना: आजच्या दिवशी ॐ नमो भगवते वासुदेवाय या मंत्राचा जप करावा किंवा विष्णू सहस्त्रनामाचे पठण करावे.

सूर्यनमस्कार व प्राणायाम: मेष आणि अश्विनी दोन्हीमध्ये अग्नी आणि गती तत्त्व आहे. आजच्या दिवशी शारीरिक व्यायाम किंवा सूर्यनमस्कार केल्याने शरीरातील ऊर्जा वाढेल.

नकारात्मकता टाळा: आजच्या योगामुळे स्वभावात थोडी घाई किंवा चिडचिड होऊ शकते. त्यामुळे कोणतेही मोठे निर्णय घेताना घाई न करता शांत डोक्याने विचार करा.

थोडक्यात सांगायचे तर, आजचा दिवस हा ''वेग, उत्साह आणि सात्त्विकता'' यांचा त्रिवेणी संगम आहे!

आजचे नक्षत्र: (शनिवार ) भरणी नक्षत्र, नक्षत्र चक्रातील हे दुसरे नक्षत्र आहे. याचा स्वामी शुक्र आहे आणि याचे दैवत यमराज (न्याय आणि परिवर्तनाचे देव) आहेत. याचे प्रतीक योनी (नवनिर्मिती किंवा गर्भाशय) आहे.

**संस्कृत श्लोक :**

कृतनिश्चयो दृढमतिः सुभगो दक्षोऽनृतप्रियो भवति।
भोक्ता च विक्रमी च प्रमदाप्रियकृद् भवेद् भरण्याम्।।

विवेचन: परिवर्तन आणि शिस्त: यमराज हे केवळ मृत्यूचे देव नाहीत, तर ते शिस्त, नियम आणि परिवर्तनाचे प्रतीक आहेत. त्यामुळे उद्याचा दिवस स्वतःमध्ये काही चांगले बदल घडवण्यासाठी किंवा एखादी जुनी, निरुपयोगी सवय सोडून देण्यासाठी उत्तम आहे.

नवनिर्मिती आणि सहनशीलता: भरणी नक्षत्रात सहनशक्ती खूप असते (जसे मूल जन्माला घालताना माता सहन करते). आजच्या दिवशी कष्टाची कामे पूर्ण करण्याची ताकद अंगात असेल.

शुक्राचा प्रभाव: शुक्राच्या प्रभावामुळे या नक्षत्रात कला, सौंदर्य आणि भौतिक सुखांची आवड निर्माण करण्याची क्षमता असते.

आजची तिथी: त्रयोदशी – शनि प्रदोष

शनिवार असल्याने आणि त्रयोदशी तिथी असल्याने आज शनि प्रदोष हा अत्यंत महत्त्वाचा योग बनत आहे. याचे स्वामी कामदेव आणि भगवान शिव आहेत.

**संस्कृत श्लोक :**

त्रयोदश्यां तु जायन्ते कीर्तिमान् सुभगः सुधीः।
दाता भोक्ता च शूरश्च शिवपूजारतः सदा।।

विवेचन: शिवकृपा आणि शनिदोष निवारण: शनिवारी येणारा प्रदोष हा भगवान शंकराच्या पूजेसाठी सर्वोत्तम मानला जातो. यादिवशी शिव उपासना केल्याने आयुष्यातील संकटे, अडथळे आणि शनीचे दोष दूर होतात.

काय करावे?: संध्याकाळी सूर्यास्तानंतर शिवमंदिरात जाऊन किंवा घरीच शंकराची पूजा करावी, महामृत्युंजय मंत्राचा जप करावा. कष्टाच्या आणि शिस्तीच्या कामांना प्राधान्य द्यावे.

काय टाळावे?: भरणी नक्षत्राच्या प्रभावामुळे स्वभावात थोडा हेकटपणा (हट्ट) किंवा उतावळेपणा येऊ शकतो, त्यावर नियंत्रण ठेवा. कोणाशीही विनाकारण वाद घालणे टाळा.

आजचा दिवस तुमच्यासाठी शिवकृपेने आणि भरणी नक्षत्राच्या दृढ शक्तीने समृद्ध जावो!

कृतज्ञ मी कृतार्थ मी
भगवंत हृदयस्थ आहे




# भुर्र उडालेली ती चिमणी...!

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

तेव्हा आणि त्या एका सायंकाळी ध्येयाने प्रेरित झालेल्या चिमणीच्या मनाला कोणीही थांबवू शकत नव्हते, कुठून कसे, काय माहित पण वस्तीवरील मुलांसाठी आणि तिच्यासाठी उपलब्ध झालेले ते शालेय साहित्य. आणि तिथूनच झालेली ती एक सुरुवात.

कोण चूक कोण बरोबर साखर शाळा आणि साखर शाळेचे प्रश्न ? याच्यात न अडकता झालेली नवी सुरुवात आणि.. या विचाराच्या तंद्रीत डोळ्यासमोर त्याच वस्तीतील पिंट्या, पप्या, बंटी आणि इतर मुले ही चिमणीच्या नादाने रात्री वस्तीमध्ये...

ती एक एक सायंकाळ त्या कविता तो बाराखडीचा आवाज शिळोप्याला साऱ्या शिवारात घुमू लागला. मोठ्यांच्या नादाने ती छोटी छोटी मुले ही अक्षरे अंक काट्या वाट्या काढताना चे चित्र पाहून जणू चांदण्या आणि चंद्र ही जणू अभ्यासाला येऊ लागले.

काय बरोबर काय चूक किंवा कुठे समस्या कसले समाधान, यापेक्षा आपण काहीतरी चांगले केले याचे एक वेगळे समाधान चिमणीच्या पंखात बळ भरण्याचे काम करू लागले.

आपण या समाजाचे काहीतरी देणे लागतो. आणि सामाजिक भान म्हणून या समाजासाठी काहीतरी करूच शकतोची प्रेरणा चिमणीला स्वस्थ बसू देत नव्हती, समस्या, समाधान यापेक्षा इथे आत्मविश्वासाचा पाया मजबूत केला तर, समस्या सोडवण्यासाठी यातून मार्ग निघू शकेल. पण म्हणजे असे म्हणायचे आहे की सगळ्याच बाजूंनी समस्या असेल तर एखादी गोष्ट खूप कठीण असते.पण कुठून जरी आशेचा एक किरण म्हणजे उदा. घनदाट अंधारात एक कवडसाही दावी आशेचा एक किरण नवा,

कोणाला दोष द्यायचा नाही. पण जर शिक्षणाची जाणीव जागृती निर्माण केली, आणि त्याच्यानंतर त्या म्हणजे सर्व समस्या लक्षात घेता बरं का! मुलांना स्वयं अध्ययन सारख्या उपक्रमाचे आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून, स्वतः स्वयं अध्ययन करून पालकांच्या समस्या उपाययोजना किंवा अन्य कारणा नी न थांबता कोण बरोबर हा प्रश्न सोडवण्या पेक्षा सुरुवात होणे गरजेचे होते.

स्वयं अध्ययन करून संध्याकाळी वस्तीमध्ये इतर सर्व मुलांना एकत्र करून त्यांचा अभ्यास घेता घेता स्वतःचा अभ्यास ही स्वयं अध्ययन करून बाहेरून परीक्षा देवून चिमणीने जी भरारी घेतली त्याचे



फळ म्हणजे ग्रामसेवक झालेली आजची ही चिमणी.

तिने स्वतःच्या वस्तीतील मुलांसाठी विशेष उपक्रम करून वेगवेगळे प्रयोग करून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न त्याला तोड नव्हती.

तिला माहित होते, सामान्य मुलांपेक्षा कष्ट करणारी ही मुले, आणि त्यांना मिळालेला तो तास दीड तासाचे फळ ....म्हणजे तालुका स्तरावर अव्वल स्थानावर येणारा स्कालरशीप मिळवून इंजिनियरिगच्या पहिल्या वर्षाला असणारा

पप्या, ओढ्या ओघळाने मासे पकडत हिंडणारा आता बिझनेस साठी धडपडणारा पिंट्या होय ...

समस्या आणि समाधान तर होतेच आणि असणारच पण तरीही चिमणीच्या प्रयत्नाने हुरूप येवून मुलांना गोडी निर्माण झाली. त्यांचा आत्मविश्वास वाढून नवीन काहीतरी करण्याची उमेद निर्माण झाली. त्यांच्यातील न्यूनगंड शिक्षणाची भीती होऊन

सुरुवातीला नाही, परंतू काही दिवसानंतर सकारात्मक बदल दिसू लागला.




क्षण पळे पळतात काही महिन्याच्या कालावधी नंतर

मिनिट तास म्हणता म्हणता वर्षे कशी निघून गेली कळलेच नाही. आणि एका नव्या रुपात नव्याने पुन्हा...

जळालेल्या पाचटीच्या राखे खालून ही पुन्हा त्या खोडव्याला फुटू पाहणाऱ्या त्या अंकुरतून फुटलेली ती हिरवी पाने डोळ्यासमोर येऊ लागली.

कोण? काय ? कसे? कुठे? समस्या, समाधान, समज, गैरसमज, कोवळ्या मनांवर होणारे परिणाम, दोष, उणीव जाणीव, जागृती खूप सारे प्रश्न त्यांच्यासमोर आ वासून उभे असताना ; पण या आणि अशा कितीतरी प्रश्नात न अडकता संकटांना सामोरे जाता जाता किती काळ गेला. यापेक्षा टोचलेल्या त्या एका धसाडी ने आज कित्येक मनातील सल निघून तिची राख झाली. पण राखे खालून फुटणारा तो अंकुर खूप काही शिकवून गेला. म्हणजे म्हणातात ना! जिथं सारं संपल आहे. तिथूनच तर एक नवी सुरुवात होत असते.

पण ? जिच्यामुळे ही सुरुवात झाली, आज तिला ... विचारात त्या वस्तीवरील ते झोपाळ्यातले ते लहान मूल

चिमणीचे बोट धरून हसत...

एवढ्यात त्या आवाजाने,

''चला निघायचं ना''आणि चिमणीच्या विचाराची तंद्री मोडली.

''हा, ...हो...हो...''

''तू''

''हो''

''मीच''

राखेच्या ढिगाऱ्याखालून फुटणाऱ्या त्या अंकुरकडे बोट दाखवत...

उद्या एका नव्या आशेच्या किरणाच्या शोधात....

गाडीच्या चाकाने धाव घेतली. आणि चाके फिरू लागली.

कुतुहल म्हणून सहज बाजूला लक्ष गेले.

संपता संपता संपता ना

जळालेल्या पाचटीच्या राखे खालून ही, पुन्हा त्या खोडव्याला फुटू पाहणाऱ्या त्या अंकुरकडे लक्ष गेले.

आणि उंच आकाशात चमकणारी ती चांदणी, अणि त्याच चांदणीत दिसणारी ती चिमणी प्रतिकृती .....

परतीच्या वाटेवर मागे वळून पाहताना डोन्ट से गुड बाय बोलता बोलता..!! क्रमशः

एका हरवलेल्या क्षणी भावनेचे मळभ दाटून आले आणि वळीवा परी बरसून गेले. यातून कोणाच्या भावना दुखवावयाच्या नाहीत.

# भावलेले शनी स्तोत्र...

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

तेव्हा दशरथांनी क्रोधाचा त्याग करून अत्यंत नम्रतेने शनी देवांची ही स्तुती (स्तोत्र) रचली.

३. स्तोत्रातील अनोखी किमया

या स्तोत्राची रचना खूप विशेष आहे. यात शनी देवांच्या उग्र रूपाचे अत्यंत सुंदर आणि वास्तववादी वर्णन केले आहे:

कृष्णाया नीलाया शितिकण्ठ निभाय च शनी देवांच्या कृष्ण आणि नील रंगाचे वर्णन.

तुष्टो ददासि वै राज्यं रुष्टो हरसि तत्क्षणात् ''तुम्ही प्रसन्न झालात तर राज्य देता आणि रुष्ट झालात तर एका क्षणात ते हिरावून घेता.'' हे विधान शनी देवांच्या न्यायप्रिय आणि सामर्थ्यवान रूपावर अचूक प्रकाश टाकते.

४. भक्ती आणि न्यायाचा मिलाफ

मरणसमयी केवळ राम नावाचा ध्यास असणारे दशरथ महाराज जेव्हा हे स्तोत्र म्हणतात, तेव्हा ती केवळ एका ग्रहाची भीती नसते, तर ती ईश्वराच्या न्याय व्यवस्थेला दिलेली आदरांजली असते. शनी देव हे देखील सूर्यपुत्र आणि शिवाचे परम भक्त आहेत. त्यामुळे दशरथांनी केलेली ही स्तुती म्हणजे भक्ती आणि न्याय यांचा एक अद्भूत संगम आहे.

थोडक्यात सांगायचे तर...

हे स्तोत्र आपल्याला शिकवते की संकटाच्या वेळी अहंकार बाजूला ठेवून, अत्यंत नम्रतेने परिस्थितीला सामोरे जावे लागते. साक्षात रघुवंशाच्या राजाने शनी देवांसमोर नतमस्तक होऊन रचलेले हे स्तोत्र आजही लाखो लोकांना मानसिक बळ आणि संकटातून मार्ग काढण्याची प्रेरणा देते, हीच खरी या स्तोत्राची किमया आहे!

हेच काहीतरी मनात होतं. नाराजी निराशा दोष न दाखवता शनिची स्तुती करून विनम्रता व शरणागतीचा मार्ग दिला आहे हाच गूढ अर्थ नाही का

जेव्हा माणसावर संकट येते, तेव्हा सामान्यतः मनात नाराजी, संताप, नैराश्य येते किंवा माणूस नशिबाला आणि देवाला दोष देऊ लागतो. पण राजा दशरथांनी या स्तोत्रात जो मार्ग दाखवला आहे, तो मानवी स्वभावाच्या पलीकडचा आहे. या गूढ अर्थाचे काही महत्त्वाचे पदर खालीलप्रमाणे आहेत:

१. दोषांऐवजी गुणांचे कौतुक (सकारात्मकता)

शनी देवांचे रूप उग्र, भयानक आणि संहारक मानले जाते. या स्तोत्रात दशरथांनी शनी देवांच्या त्याच भयानक रूपाचे उदात्तीकरण केले आहे. नमो निर्मांस देहाय, शुष्कोदर भयाकृते, नमो घोराय रौद्राय असे म्हणून त्यांनी शनी देवांच्या उग्रतेला कारुण्य आणि आदराचा भाव दिला आहे. संकटाकडे बघण्याचा हा दृष्टिकोनच विलक्षण आहेसंकटाचा द्वेष न करता त्याच्या शक्तीचा आदर करणे.

२. अहंकाराचा संपूर्ण त्याग आणि शरणागती



राजा दशरथ हे चक्रवर्ती सम्राट होते. साक्षात देवाचे पिता असण्याचा अहंकार कोणालाही होऊ शकतो. परंतु, जेव्हा त्यांना समजले की शनी देवांच्या कोपामुळे सृष्टीवर संकट येणार आहे, तेव्हा त्यांनी आपले शौर्य, आपले अस्त्र आणि आपला राजेशाही अहंकार बाजूला ठेवला.

प्रसाद कुरु मे देव वाराहोऽहमुपागतः

(अर्थात: ''हे देवा, मी तुम्हाला शरण आलो आहे, आता माझ्यावर कृपा करा.'')

हा संतापावर आणि निराशेवर नम्रतेने मिळवलेला विजय आहे.




३. प्रतिकार नाही तर स्वीकार

शनी देव हे कर्माचे कारक आहेत. दशरथांना हे ठाऊक होते की शनीशी युद्ध करून किंवा त्यांच्यावर नाराज होऊन प्रारब्ध बदलणार नाही. म्हणून त्यांनी प्रतिकाराऐवजी स्वीकार निवडला. जेव्हा आपण एखाद्या संकटाचा किंवा शिक्षेचा न्याय म्हणून स्वीकार करतो, तेव्हा त्या संकटाची धार आपोआप कमी होते.

४. मानवी जीवनासाठी सर्वात मोठा धडा

या स्तोत्राचा गूढ संदेश हाच आहे की: ''परिस्थिती जेव्हा तुमच्या नियंत्रणाबाहेर असते, तेव्हा संघर्ष हा शस्त्राने नाही तर नम्रतेने आणि शरणागतीने करायचा असतो.''

मरणसमयी राम नाम घेणाऱ्या दशरथांना हे मर्म आधीच ठाऊक होते की शनी असो वा राम, दोन्ही एकाच परमेश्वराची रूपे आहेतएक न्यायाचे रूप आहे, तर दुसरे कृपेचे. न्यायाचा आदर केल्याशिवाय कृपेची प्राप्ती होत नाही, हाच तो सुंदर आणि गूढ विचार आहे !

कृतज्ञ मी कृतार्थ मी
भगवंत हृदयस्थ आहे

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559